# प्रेसनोट

# टेलीग्राम/व्हॉटस्अॅप ग्रुपद्वारे इन्वेस्टमेंट फ्रॉडचे रॅकेट चालवणाऱ्या गुन्हेगारांना आर्थिक व्यवहारासाठी बनावट बॅंक खाती उघडून पुरवणाऱ्या आरोपींना अटक

## गुन्ह्याची थोडक्यात माहिती:-

**सायबर पोलीस ठाणे पश्चिम विभाग, गुन्हे शाखा, गु. अ. वि., मुंबई येथे नोंद गु. रजि. क्र.१९०/२०२६, कलम ३१८ (४), ३१९ (२), ३३६ (२), ३३६ (३), ३३८, ३४० (२), ३ (५) भारतीय न्याय संहिता, २०२३ सह कलम ६६ (क), ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान कायदा या गुन्ह्यामधील तक्रारदार यांना पाहिजे आरोपी यांनी व्हॉट्स्अॅपद्वारे संपर्क करून NAM AMC HNW या शेअर मार्केट ट्रडींग अॅपद्वारे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळवून देण्याच्या आमिषाने एकूण १,८९,२५,०००/- रुपये वेगवेगळ्या बॅंक खात्यांमध्ये भरावयास भाग पाडून फसवणूक केली आहे.**

## अटक आरोपी व गुन्ह्यातील भूमिका व कार्यपद्धती:-

**1.** विठ्ठल लक्ष्मण वाघमोडे, वय ३६ वर्षे, इंदापूर, पुणे

आरोपी क्र २ याच्या सांगण्यावरून आरोपी क्र. ३ च्या मदतीने बॅंक ऑफ इंडीयामध्ये चालू खाते ओपन करून ते **'786-Wisdom Launch Club'** हा व्हॉटस्अॅप ग्रुप चालवणाऱ्या आरोपींना सायबर गुन्हयासाठी वापरण्यास दिले.

**2.** रमेश हरिबा लवंगारे, वय ४९ वर्षे, कामोठे, नवी मुंबई

**'786-Wisdom Launch Club'** टेलीग्राम ग्रुपचा सदस्य बनून ते सांगतील त्याप्रमाणे बनावट बॅंक खाती उघडून ते सायबर गुन्हयास पुरविले.

**3.** नानासाहेब अरुण पारखे, वय ३३ वर्ष, कळंबोली, पनवेल

प्रथम लेयर बेनिफिशिअरी खातेधारक आरोपी क्र १ यास बनावट खाते उघडून देण्यास मदत केली व प्रथम बेनिफिशिअरीच्या खात्यावर आलेल्या पैशाची विल्हेवाट लावली.

**४.** अमोल शांतीलाल कुंभार, वय ३९ वर्षे, कामोठे, नवी मुंबई

प्रथम बेनिफिशिअरी याच्या खात्यावर आलेले पैसे स्वत:च्या खात्यावर घेऊन ते स्वत: व आरोपी क्र. ३ यांच्यामध्ये समान वाटून घेऊन त्या पैशांचा अपहार केला.

## हस्तगत मालमत्ता-

१. ६ अॅन्ड्रॉईड मोबाईल हॅंडसेट
२. रोख रक्कम रूपये ९,८६,४००/-
३. पोर्टलवर गोठविण्यात आलेली रक्कम २८,५६,२९३/- रूपये.

### तपास पथक-

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सुवर्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

सदर कारवाईमध्ये प्र. पो.नि. संदीप पाटील, स.पो.नि. पुनम जाधव, स.पो.नि. अंजली वाणी, स.पोनि. शंकर पाटील, पो.उपनि. शिवाजी सावले, पो.शि. केशव तकीक, पो.शि. मोहित नेलावडे यांनी परिश्रम घेतले आहेत.

## सायबर सुरक्षा सूचना:-

1.अनोळखी मोबाईल/WhatsApp नंबरवरून आलेली APK फाईल इन्स्टॉल करू नये. तसेच अनोळखी मोबाईल/WhatsApp नंबरवरून आलेल्या ZIP file Extract करू नयेत.

2. WhatsApp/Telegram किंवा इतर सोशल मीडिया माध्यमांवरून शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखविणाऱ्या अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये.

3.कोणतीही व्यक्ती नामांकित Investment Company/Stock Market Expert Broker किंवा Financial Advisor असल्याचे सांगत असल्यास त्याची अधिकृत वेबसाईट SEBI Registration Number व इतर अधिकृत माहिती स्वतंत्रपणे तपासल्याशिवाय गुंतवणूक करू नये.

4.कमी कालावधीत मोठा नफा, हमीचा परतावा, VIP Trading Account Special IPO, Guaranteed Profit किंवा Double Return अशा आकर्षक आश्वासनांना बळी पडू नये.

5.गुंतवणुकीसाठी कोणत्याही अनोळखी व्यक्तीने दिलेल्या Bank Account/ UPI ID किंवा Payment Link वर पैसे जमा करू नयेत. गुंतवणुकीची रक्कम अधिकृत व पडताळलेल्या माध्यमातूनच भरावी.